जा. क्र. / ४२१ /२०२६,
जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, गडचिरोली,
दिनांक : १८/०२/२०२६.

# जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, गडचिरोली

## निविदा सुचना (Tender Notice)

जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, गडचिरोली तर्फे दिनांक **०८.०३.२०२६** रोजी ता. देसाईगंज (वडसा), जिल्हा गडचिरोली येथील **तालुका क्रिडा संकुल, देसाईगंज (वडसा) येथिल खुल्या परिसरात** आयोजित महा विधी सेवा शिबिरासाठी **सजावट व मंडप व्यवस्था (सुमारे १५०० ते २००० लोकांसाठी)** या कामासाठी अनुभवी पुरवठादारांकडून दरपत्रके मागविण्यात येत आहेत.

- **दरपत्रक सादर करण्याचा अंतिम दिनांक व वेळ व ठिकाण:**
  दिनांक २५.०२.२०२६, सायंकाळी ०५.०० वाजेपर्यंत.
  **ठिकाण:** जिल्हा विधी सेवा प्राधिकरण कार्यालय, गडचिरोली.
- **दरपत्रक उघडण्याचा दिनांक, वेळ व ठिकाण:**
  दिनांक: २६.०२.२०२५, सकाळी १०.३० वाजता.
  **ठिकाण:** जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, गडचिरोली कार्यालय.

इच्छुकांनी दरपत्रकांमध्ये अंतर्भुत असणारी माहिती, सविस्तर अटी व शर्ती जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, गडचिरोली आणि दिवाणी व फौजदारी न्यायालय देसाईगंज (वडसा) या कार्यालयांचे सुचना फलकावर आणि जिल्हा न्यायालय, गडचिरोलीचे संकेतस्थळावर (https://gadchiroli.dcourts.gov.in) पहाव्यात किंवा कार्यालयीन वेळेत संपर्क साधावा.

दिनांक: १८.०२.२०२६
ठिकाण: गडचिरोली

(अं. पुं. खानोरकर)
सचिव,
जिल्हा विधी सेवा प्राधिकरण,
गडचिरोली.

# मंडप व सजावटीसाठी दरपत्रक

| अ. क्र. | तपशिल / वस्तुंचे नाव | वर्णन / प्रमाण |
|---|---|---|
| १ | साधा मुख्य मंडप (Main Pendal) | १५०० ते २००० व्यक्तींसाठीची आसनक्षमता असेल इतका पुरेसा, उंच व हवा खेळती असणारा स्वच्छ ग्रिन / रेड कारपेटसह. |
| २ | मुख्य मंच (Stage) | सुमारे ८ व्यक्ती बसू शकतील आणि सुमारे ४ ते ५ लोक उभे राहू शकतील इतका मोठा स्वच्छ ग्रिन / रेड कारपेटसह. |
| ३ | पेंडॉल असलेले स्टॉल्स (Department Stalls) | ३५ स्टॉल्स (१० x १०), प्रत्येक स्टॉलसमोर नागरिकांसाठी सावलीची व्यवस्था. |
| ४ | पेंडॉल असलेले रजिष्ट्रेशन डेस्क (Registration Desk) व हेल्प डेस्क (Help Desk) | पुरुष व महिलांसाठी स्टॉल्सचे चे सुरवातीला प्रत्येकी एक **रजिष्ट्रेशन डेस्क आणि १ हेल्प डेस्क.** प्रत्येक डेस्कसाठी २ ते ३ कर्मचाऱ्यांना बसण्याची व्यवस्था दोन टेबलसह. |
| ५ | पेंडॉल असलेले अल्पोपहारासाठी स्टॉल्स | ४ स्टॉल्स (१० x १२), प्रत्येक स्टॉल्समध्ये २ टेबल, ३ खुर्च्या व स्टॉलसमोर नागरिकांसाठी सावलीची व्यवस्था. |
| ५ | बैठक व्यवस्था (Stage) | सुमारे ८ लोकांसाठी आलिशान सोफे (दर्जेदार व स्वच्छ) दर्जेदार टि-पॉय सह. |
| ६ | बैठक व्यवस्था (Public) | २००० खर्च्या (दर्जेदार व स्वच्छ) कव्हरिंगसह व VIP लोकांसाठी बसण्यासाठी १२ आलिशान सोफे. |
| ७ | बैठक व्यवस्था (Stalls) | प्रत्येक स्टॉलसाठी ५ खुर्च्या आणि २ मोठे टेबल. |
| ८ | ग्रिन रुम | सुमारे २० व्हि.आय.पी. लोकांसाठी वातानुकूलित/थंड हवेची सोय असलेला कक्ष, आलिशान सोफे (दर्जेदार व स्वच्छ) टी-पॉय सह. |
| ९ | प्रकाश व थंड हवेची व्यवस्था | संपूर्ण पेंडॉलमध्ये व स्टेजवर पुरेशी प्रकाश व्यवस्था, पेंडॉलमधील लोकांसाठी आवश्यकतेनुसार सायलेंट कुलर व पेडेस्टल फॅन्सची, स्टॉल्समध्ये पेडेस्टल फॅन्सची आणि स्टेजवर दर्जेदार वातानुकूलित/थंड हवेची सोय. |
| १० | ध्वनी व्यवस्था (Sound System) | मुख्य स्टेजवर २ पोडीयम माईक व ४ ते ५ कॉर्डलेस माईक, ४ किंवा आवश्यकतेनुसार बॉक्स स्पिकर व उच्च दर्जाची साऊंड सिस्टम. |
| ११ | जनरेटर बॅकअप | सुमारे ७ ते ८ तास सतत चालू शकेल असा उच्च क्षमतेचा सायलेंट जनरेटर. |

| | | |
|---|---|---|
| १२ | **प्रवेशद्वार व बॅनर** | ३ स्वागत कमानी आणि त्यावर ३ मोठे सांगण्यात येतील असे बॅनर. तसेच स्टेजवर सांगण्यात येतील असे बॅनर. |
| १३ | **सजावट** | स्टेजचे फुलांनी, स्टेजवर व स्टेजबाहेर कुंडयांमध्ये ठिकठिकाणी छोटे रोपटे ठेवून व कापडाने सुशोभिकरण. |

## अटी व शर्ती

१. इच्छुक सेवा पुरवठादारांनी आपले दरपत्रक एका बंद पाकिटावर **"महा विधी सेवा शिबिर-मंडप व सजावटीसाठी दरपत्रक"** असे लिहून जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, गडचिरोली या कार्यालयात विहित मुदतीत सादर करणे अनिवार्य राहील.

२. पुरवठादाराने दिलेले दर, हे वस्तू व सेवा कर (GST) आणि इतर सर्व शासकीय करांसह असणे आवश्यक आहे. एकदा निश्चित केलेले दर प्रक्रियेदरम्यान बदलता येणार नाहीत.

३. साहित्याची ने-आण आणि वाहतूकीचा सर्व खर्च पुरवठादाराचा राहील, यासाठी अतिरिक्त मोबदला दिला जाणार नाही.

४. दरपत्रक उघडण्याच्या वेळी इच्छुक पुरवठादार किंवा त्यांचे अधिकृत प्रतिनिधी उपस्थित राहू शकतात.

५. दरपत्रक उघडण्याच्या निश्चित केलेल्या वेळी आणि तारखेला जर पुरवठादार किंवा त्यांचे प्रतिनिधी अनुपस्थित राहील तरीही त्यांच्या अनुपस्थितीत दरपत्रकांचे लिफाफे उघडले जातील. अशा वेळी उघडलेल्या दरांबाबत किंवा प्रक्रियेबाबत पुरवठादाराची कोणतीही तक्रार किंवा आक्षेप विचारात घेतला जाणार नाही.

६. सर्व तांत्रीक निकष आणि अटी पूर्ण करणाऱ्या पुरवठादारांपैकी ज्या पुरवठादाराचे दर सर्वात कमी असतील त्या कंत्राटदाराची या कामासाठी निवड केली जाईल.

७. दरांची तुलना करताना 'एकूण खर्च' (Grand Total) विचारात घेतला जाईल. प्रत्येक वस्तूचा वेगवेगळ दर न पाहता, संपूर्ण पॅकेजसाठी जो पुरवठेदार सर्वात कमी दर देईल त्याला प्राधान्य दिले जाईल.

८. निवडलेल्या पुरवठादाराला कार्यादेश मध्ये कार्यक्रमाचे नियोजीत वेळेबाबत आगाऊ सुचना दिली जाईल.

९. पुरवले जाणारे सर्व साहित्य (उदा. पेंडॉलचे कापड, सोफे, खुर्च्या, पडदे, कार्पेट) हे अत्यंत दर्जेदार, डागविरहित आणि स्वच्छ असावे. फाटलेले, जुने किंवा तुटलेले साहित्य आढळल्यास ते नाकारले जाईल.

१०. सार्वजनिक सुरक्षिततेच्या दृष्टीने विद्युत वायरिंग पूर्णपणे सुरक्षित असावी. शॉट सर्किटमुळे होणाऱ्या कोणत्याही अपघातास पुरवठेदार सर्वस्वी जबाबदार राहील.

११. सुरू होणारा उन्हाळा लक्षात घेता, मुख्य मंडप हा उष्णतारोधक स्वरूपाचा असावा. उपस्थितांना त्रास होऊ नये म्हणून पुरेशा संख्येने कुलर्स आणि पेडेस्टल फॅन्सची सोय कंत्राटदारास करणे अनिवार्य राहील.

१२. कार्यक्रमाची भव्यता आणि व्ही.व्ही.आय.पी. उपस्थिती पाहता, नियोजित कार्यक्रम सुरु होण्याच्या किमान १२ तास आधी संपूर्ण तयारी पूर्ण होणे आवश्यक राहील. सदरचा कार्यक्रम ४ ते ७ तास चालेल. याची पुरवठादारांनी नोंद घ्यावी.

१३. कार्यक्रम यशस्वीरित्या पार पडल्यानंतर आणि जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, गडचिरोली या कार्यालयामार्फत साहित्याची / सेवेची भौतिक पडताळणी झाल्यानंतरच शासकीय नियमानुसार देयक अदा केले जाईल. आगाऊ रक्कम दिली जाणार नाही.

१४. जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, गडचिरोली या कार्यालयामार्फत निर्देश दिल्या जातील त्या प्रमाणे पुरवठादारास मंडप व स्टॉल्स व डेस्क तयार करावे लागेल आणि आवश्यक ती सजावट करावी लागेल.

१५. कार्यक्रमाचे वेळी ऐनवेळी कोणत्याही साहित्यात किंवा सेवेत वाढ (Addition) किंवा कपात (Reduction) करण्याचा अधिकार जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, गडचिरोलीकडे राखीव राहील. अशा परिस्थितीत, देयकाची अंतिम रक्कम ही प्रत्यक्ष पुरविलेल्या साहित्याच्या आणि सेवांच्या संख्यानुसार (Actual Quantity) आणि दरपत्रकांमध्ये दिलेल्या मुळ दरांनुसार (Unit Rates) कमी किंवा जास्त केली जाईल. कंत्राटदराने केवळ प्रत्यक्ष वापरलेल्या साहित्याचेच बिल सादर करणे आनिवार्य राहील.

१६. कोणतीही पुर्वसुचना किंवा कारण न देता प्राप्त झालेले दरपत्रक स्वीकारण्याचा किंवा नाकारण्याचा पुर्ण अधिकार जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, गडचिरोली कडे राखीव राहील.

दिनांक: १८.०२.२०२६
ठिकाण: गडचिरोली

(अं. पुं. खानोरकर)
सचिव,
जिल्हा विधी सेवा प्राधिकरण,
गडचिरोली.